जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०९.०७.२०२५**

‘ विनयभंग करणा-या आरोपीस सक्त मजुरीची शिक्षा ’

दिनांक ०३/०६/२०२५ रोजी सहयाद्रीनगर, आर.टी.रोड, कल्याण पश्चिम येथे आरोपी ओमकार विक्रांत निकाळजे, वय २९ वर्षे, रा.वडाळा, मुंबई याने एका ३४ वर्षीय महिलेचा विनयभंग केला होता. त्याबाबत फिर्यादी महिलेने आरोपीविरुध्द खडकपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. । ४६९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ७४, ३२९(३) प्रमाणे दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाच्या तपासात तपासी अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री.अमित पवार, व त्यांचे तपास पथकाने गुन्हयाचा तपास करुन **आरोपी विरुध्द ०६ तासाचे आत मा.न्यायालयात दोषारोपपत्र** सादर केले होते.

सदर गुन्हयाची सुनावणी मा.श्रीमती आरती शिंदे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ३ रे न्यायालय, कल्याण यांनी जलद गतीने घेवुन **केवळ एक महिन्यात** विनयभंगाच्या गुन्हयातील आरोपी ओमकार विक्रांत निकाळजे यास भारतीय न्याय संहिता कलम ७४, ३२९(३) प्रमाणे दोषी ठरवुन १ वर्ष सक्त मजुरी आणि १ महिना साधा कारावास व ५०००/- रूपये दंड पैकी २५००/- रूपये फिर्यादी यांना व २५००/- रूपये सरकार जमा करण्याबाबतचे आदेश दिलेले आहे.

सदर विनयभंगाच्या गुन्हयाच्या संदर्भात सरकारच्या वतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.प्रकाश सपकाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक/डॉ.श्री.अमरनाथ वाघमोडे, तपासी अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री.अमित पवार, पोहवा/३५८२ ठोंबरे, पोहवा/सुनिल नलावडे, मपोहवा/६८१० पाटील यांनी अथक परिश्रम करुन मा.न्यायालयात ठोस पुरावे सादर केले व त्यामुळे उपरोक्त गुन्हयातील आरोपीला दोषी ठरविण्यात यश आले आहे त्यामुळे सदर उत्कृष्ठ कामगिरीबाबत पोलीस दलात व समाजातील सर्व स्तरातुन पोलीसांचे कौतुक होत आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर